# प्रकरण ४ : संधी

★ संधी म्हणजे काय ?

जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात व त्या दोहोंबद्दल एक वर्ण तयार होतो अशा वर्णांच्या एकत्र होण्याच्या प्रकारास संधी असे म्हणतात

संधी म्हणजे सांधणे किंवा जोडणे होय.

उदा., ईश्वर + ईच्छा = ईश्वरेच्छा

संधीचे प्रकार

- स्वर संधी
- व्यंजनसंधी
- विसर्गसंधी

१). स्वरसंधी :-

एकमेकांशेजारी येणारे वर्ण जर स्वर असतील तर त्यांना स्वर संधी असे म्हणतात.

उदा., कवि + ईश्वर = कवीश्वर

स्वर संधीचे प्रकार

१). सजातीय / दीर्घत्व स्वर संधी :- ( आ, ई, ऊ )

दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास या ध्वनीबद्दल त्यांच्यात जातीतील एकच दीर्घ स्वर येतो यालाच सजातीय किंवा दीर्घत्व स्वर संधी म्हणतात.

उदा.,

| | पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|---|
| १). | मिष्ट + अन्न | अ + अ = आ | मिष्टान्न |
| २). | देव + आलय | अ + आ = आ | देवालय |
| ३). | विद्या + अर्थी | आ + अ = आ | विद्यार्थी |

४). महिला + आश्रम — आ+आ =आ — महिलाश्रम
५). मुनि + ईच्छा — इ +ई = ई — मुनीच्छा
६). गिरि + ईश — इ +ई = ई — गिरीश
७). मही +ईश — ई +ई = ई — महीश
८). गुरु + उपदेश — उ +उ = ऊ — गुरूपदेश
९). भू + उद्धार — ऊ +उ = ऊ — भूद्धार

टीप:- संधी आलेल्या अक्षरास काना (T) देऊन, दुसरी वेलान्टी (ी), दुसरा उकार (ू) असल्यास ती सजातीय स्वरसंधी असते.

2). गुणादेश / विजातीय:-(ए, ओ, अर्)

नियम -
'अ' किंवा 'आ' यांच्यापुढे 'इ' किंवा 'ई' आल्यास त्या दोहोंऐवजी ओ येतो आणि 'अ' किंवा 'आ' यांच्यापुढे 'ऋ' आल्यास त्या दोहोंऐवजी अर् येतो. या बदलास संस्कृतमध्ये गुण असे म्हणतात. आणि संधी होताना एका वर्णाच्या जागी दुसरा वर्ण आल्यास याला आदेश म्हणतात.

उदा.,

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| १). ईश्वर + इच्छा | अ + इ = ए | ईश्वरेच्छा |
| 2). गण + ईश | अ + ई = ए | गणेश |
| 3). उमा + ईश | आ+ई = ए | उमेश |
| ४). चंद्र + उदय | अ +उ = ओ | चंद्रोदय |
| ५). महा + उत्सव | आ +उ = ओ | महोत्सव |
| ६). देव + ऋषी | अ + ऋ = अर | देवर्षी |
| ७). महा + ऋषी | आ + ऋ = अर् | महर्षी |

3). वृद्ध्यादेश :- (ऐ, औ)

नियम -
'अ' किंवा 'आ' यांच्यापुढे 'ए' किंवा 'ओ' आल्यास ऐ होतो. 'अ'/'आ' + 'ओ'/'औ' = 'औ'

उदा.,

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
| --- | --- | --- |
| १). एक + एक | अ + ए = ऐ | ऐकेक |
| २). मत + ऐक | अ + ऐ = ऐ | मतैक्य |
| ३). सदा + एव | आ + ए = ऐ | सदैव |
| ४). प्रजा + ऐक्य | आ + ऐ = ऐ | प्रजैक्य |
| ५). जन + ओघ | अ + ओ = औ | जनौघ |
| ६). गंगा + ओघ | आ + ओ = औ | गंगौघ |
| ७). वृक्ष + औदार्य | अ + औ = औ | वृक्षौदार्य. |

ब). यणादेश स्वर संधी:- ('य', 'व', 'र')

नियम -
'इ' व 'ऋ' (ऱ्हस्व किंवा दीर्घ) यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास यांच्याबद्दल 'इ', 'ई' बद्दल 'य' पुढील स्वर मिश्र. ळतो. 'उ', 'ऊ' बद्दल 'व' हा वर्ण येऊन पुढील स्वर त्यात मिसळतो आणि 'ऋ' बद्दल 'र' हा वर्ण येऊन पुढील स्वर मिसळतो व संधी होते.

उदा.,

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
| --- | --- | --- |
| १). इति + आदी | ई + आ = य् + आ = या | इत्यादी |
| २). प्रिति + अर्थ | इ + अ = य् + अ = य | प्रित्यर्थ |
| ३). अति + उत्तम | इ + उ = य् + उ = यु | अत्युत्तम |
| ४). प्रति + एक | इ + ए = य + ए = ये | प्रत्येक |
| ५). सु + अल्प | उ + अ = व् + अ = व | स्वल्प |
| ६). मनु + अंतर | उ + अ = व् + अ = व | मन्वंतर |
| ७). पितृ + आज्ञा | ऋ + आ = र + आ = रा | पित्राज्ञा. |

टीप:- 'इ' व 'ऋ' यांच्याबद्दल अनुक्रमे 'य' व 'र' आल्यास त्यांना यणादेश म्हणतात. 'य' व 'र' यांच्याबद्दल अनुक्रमे 'इ' व 'ऋ' आल्यास त्यांना संप्रसारण म्हणतात.

येथे = इये = इ

नेऊ = नऊ = उ

रीण = ऋषी = ऋ

५). अयादी आदेश स्वरसंधी (अय्, आय्, अव्, आव्)

नियम :-

'ए', 'ऐ', 'ओ', 'औ' या स्वरापुढे विजातीय स्वर आला तर त्याबद्दल अनुक्रमे अय्, आय्, अव्, आव् असे आदेश करून पुढील स्वर यात मिसळतो व संधी येते.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| १). ने + अन | ए + अ = अय् + अ = अय | नयन |
| २). गै + अन | ऐ + अ = आय् + अ = आय | गायन |
| ३). गो + ईश्वर | ओ + ई = अव् + ई = अवी | गवीश्वर |
| ४). नौ + इक | औ + इ = आव् + इ = आवि | नाविक |

२). व्यंजन संधी :-

व्यंजन संधी म्हणजे काय ?

जवळजवळ येणाऱ्या दोन वर्णांपैकी दोन्हीही व्यंजने स्वर असतील व दुसरा वर्ण स्वर असेल तेव्हा त्याला 'व्यंजन संधी' असे म्हणतात.

उदा.,

१) सत् + जन (त् + ज) सज्जन

२) चित् + आनंद (त् + आ) चिदानंद.

## ❋ व्यंजन संधीचे प्रकार :-

1) प्रथम व्यंजन संधी
2) तृतीय व्यंजन संधी
3) आनुनासिक व्यंजन संधी
4) 'त' ची व्यंजन संधी
5) 'म्' ची व्यंजन संधी
6) 'छ' ची व्यंजन संधी

### 1) प्रथम व्यंजन संधी :-

स्पर्श व्यंजनापैकी आनुनासिकाशिवाय कोणत्याही कठोर व्यंजनापैकी / व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले तर त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होते याला प्रथम व्यंजन संधी असे म्हणतात.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| 1) विपद् + काल | द् + क = त् + क = त्क | विपत्काल |
| 2) वाग् + पति | ग् + प = क् + प = क्प | वाक्पती |
| 3) वाग् + ताडन | ग् + त = क् + त = क्त | वाक्ताडन |
| 4) षड् + शास्त्र | ड् + श = ट् + श = ट्श | षट्शास्त्र |
| 5) क्षुध् + पिपासा | ध् + प = त् + प = त्प | क्षुत्पिपासा |

### 2) तृतीय व्यंजन संधी :-

पहिल्या 5 वर्गातील कठोर व्यंजनापुढे अनुनासिकाखेरीज स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील 3 रे व्यंजन येऊन संधी होते याला तृतीय व्यंजन संधी म्हणतात.

उदा.,

| पोटशब्द | एकत्र तयार होणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| 1) वाक् + ईश्वरी | ग + ई = ग् + ई = गी | वागीश्वरी |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. वाक + विहार | ग + व = ग् + व = ग्व | वाग्विहार |
| 3. षट + रिपू | ट + र = ड + र = ड्र | षड्रिपू |
| 4. सत् + आचार | त् + आ = द + आ = दा | सदाचार |
| 5. अच + आदी | च् + आ = ज + आ = जा | आजादी |
| 6. अ + ज | प् + ज् = ब + ज = ब्ज | अब्ज |

## 3. अनुनासिक व्यंजन संधी :-

स्पर्श व्यंजन गटातील प्रथम व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास त्या पहिल्या व्यंजनाबद्दल त्यांच्याच वर्गातील अनुनासिक येऊन संधी होते याला अनुनासिक संधी म्हणतात

उदा.,

| पोटशब्द | एकत्र तयार होणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| 1. वाक् + निश्चित | ग् + न् = ङ् + न् = ङ्न | वाङ्निश्चय |
| 2. षट + मास | ट + म् = ण् + म् = ण्म | षण्मास |
| 3. जगत + मान | त् + म् = न् + न् = न्न | जगन्नाथ |
| 4. सत् + मती | त् + म् = न् + म = न्म | सन्मती |

## 4. 'त्'ची व्यंजनसंधी :-

'त' या व्यंजनापुढे -

1. च, छ आल्यास त् बद्दल च् येतो.
2. ज, झ आल्यास त् बद्दल ज् येतो.
3. ड, ढ आल्यास त् बद्दल ड येतो.
4. ल् आल्यास त् बद्दल ल् येतो.

| पोटशब्द | एकत्र ~~येणारे~~ तयार होणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| 1. सत् + चरित्र | त् + च् = च् + च् = च्च् | सच्चरित्र |
| 2. उत् + छेद | त् + छ = च्छ + छ = च्छ | उच्छेद |
| 3. सत् + जन | त् + ज् = ज + ज् = ज्ज् | सज्जन |
| 4. उत् + लंघन | त् + ल् = ल् + ल् = ल्ल् | उल्लंघन |

५). 'म' ची व्यंजन संधी :-

'म्' पुढे स्वर आल्यास तो मागील 'म्' मध्ये मिसळून जातो. व्यंजन आल्यास 'म्' बद्दल मागील अक्षरावर बिंदू येतो.

उदा., १). सम् + आचार = समाचार
२). सम् + जय = संजय

६). 'छ' ची व्यंजन संधी :-

छ पूर्वी ऱ्हस्व स्वर आला तर त्या दोहोमध्ये च हा ऱ्हस्व स्वर येतो.

उदा., १). रत्न + छाया = रत्नछाया
२). मुक्त + छंद = मुक्तछंद

३). विसर्ग संधी :-

एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा स्वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो तेव्हा त्याला विसर्ग संधी असे म्हणतात.

उदा., १). मन: + रंजन = मनोरंजन
२). नि: + अंतर = निरंतर

विसर्ग संधीचे प्रकार

१). विसर्ग उकार संधी :-

विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाच्या उ होतो व तो मागील अ मध्ये मिसळून त्याचा ओ होतो. याला विसर्ग उकार संधी असे म्हणतात.

उदा.,

| पोटशब्द | एकत्र येणारे व्यंजन व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| १). मन:+रंजन | मन् + ओ + रंजन | मनोरंजन |

| | | |
|---|---|---|
| २). यशो: + दीप | यश् + ओ + दीप | यशोदीप |
| ३). यशा: + धन | यश् + ओ + धन | यशोधन |
| ४). अधा: + वदन | अध् + ओ + वदन | अधोवदन |
| ५). तेजा: + निधी | तज् + ओ + निधी | तेजोनिधी |

२). विसर्ग र संधी :-

विसर्गाच्या मागे अ व आ खेरीज कोणताही स्वर आल्यास पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा र होऊन संधी होते याला विसर्ग र संधी असे म्हणतात.

| पोटशब्द | एकत्र येणारे व्यंजन संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| १). दु: + जन | दुर् + जन | दुर्जन |
| २). नि: + अंतर | निर् + अंतर | निरंतर |
| ३). बही: + रंग | बहिर् + अंग | बहिरंग |
| ४). आयु: + वेद | आयुर् + वेद | आयुर्वेद |

टीप:- र च्या पुढे र हा वर्ण आल्यास त्यातील एका र चा लोप होऊन मागील ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो.

उदा., १). नि: + रस = निरस नीरस.

३). विसर्ग ष ची संधी :-

विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून क, ख, प, फ हे वर्ण आले तर विसर्गाचा ष होऊन संधी होते.

उदा.,

१). दु: + काळ = दुष्काळ
२). नि: + पाप = निष्पाप
३). नि: + फल = निष्फळ
४). दु: + परिणाम = दुष्परिणाम

अपवाद:- दु: + ख , नि: + पक्ष

## ४). विसर्ग कायम किंवा लोप संधी

विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे क, ख, प, फ ही कठोर व्यंजने आली तर विसर्ग कायम राहतो परंतू पुढे अन्य स्वर आल्यास विसर्ग लोप पावतो.

१). प्रात: + काल = प्रात:काल
२). तेजा: + पुण्य = ~~तेज: पुंज~~ तेजा: पुण्य
३). तेज: + पुंज = तेज: पुंज
४). इत: + अंतर = इतअंतर

## ५). र बद्दल विसर्ग येणारी संधी :-

पहिल्या शब्दाच्या पुढे र आल्यास त्यापुढे विसर्ग आल्यास र चा विसर्ग होतो.

उदा.,
१). अंतर + करण = अंत:करण
२). चातुर + सुत्री = चातु:सुत्री
३). अंत + करण = अंत:करण

## ६). स ऐवजी विसर्ग येणारी संधी :-

पहिल्या शब्दाच्या शेवटी स असून पुढे कठोर वर्ण आल्यास स चा विसर्ग होतो.

उदा.,
१). मनस् + पटल = मन:पटल
२). तेजस् + कण = तेजा:कण

## ७). र कायम संधी :-

विसर्गाच्या ऐवजी येणाऱ्या 'र' च्या ऐवजी 'व' पुढे मृदू वर्ण आल्यास तो र तसाच राहतो.

उदा.,
१). पुनर् + जन्म = पुनर्जन्म
२). पुनर् + वापर = पुनर्वापर

8). विसर्ग 'श', 'स' संधी :-

विसर्गाच्या पुढे 'च', 'छ' आल्यास विसर्गाचा 'श' होतो पण 'त', 'थ' आल्यास विसर्गाचा स होतो.

उदा., 1). मन: + चक्षु = मनश्चक्षू
2). मन: + ताप = मनस्ताप

9). विसर्ग विकल्प संधी :-

विसर्गाच्या पुढे 'श', 'स' आल्यास विसर्ग विकल्पाने कायम राहतो किंवा लोप पावतो.

उदा.,

1). दु: + शासन = दु:शासन / दुश्शासन
2). नि: + संकेत = नि:संकेत
3). नि: + संदेह = नि:संदेह

10). 'कृ' धातूची विसर्ग संधी :-

विसर्गाच्या पुढे कृ धातूंची रूपे (कर किंवा कार) आल्यास विसर्गाचा स होऊन संधी होते.

उदा., 1). भा: + कर = भास्कर
2). नम: + कार = नमस्कार

☆ मराठीतील विशेष संधी :- (2)

1). पूर्वरूप संधी
2). पररूप संधी

## १). पुर्वरूप संधी :-

दोन विजातीय स्वर एकापाठोपाठ आल्यास त्यातील दुसरा स्वर लोप पावतो व स्वर कायम राहतो याला पुर्वरूप संधी म्हणतात.

उदा.,

१). खिडकी + आत = खिडकीत
२). नदी + आत = नदीत

## २). पररूप संधी :-

एकत्र येणाऱ्या स्वरापैकी पहिला स्वर लोप पावतो व दुसरा स्वर कायम राहतो याला पररूप संधी असे म्हणतात.

उदा.,

१). कर् + ऊन = अ + उ = करून
२). घर् + ई = अ + ई = घरी
३). सांग + येन = सांगेन
४). घाम + ओळे = घामोळे